MHRG100000782014

नियमित दिवाणी दावा क्रमांक : ०५/२०१४
गणपत भागोजी सुतार उर्फ कदम व १
वि.
पार्वती महादेव कदम व १

निशाणी क्र. १११ वरील आदेश

वादी यांनी सदर दावा प्रतिवादी विरुध्द मौजे परसुले, ता. पोलादपूर, जि. रायगड येथील जुना स.नं. २, हि.नं. २६ब, गट नं. ७६५ अशा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. १ ने केलेले अनिधकृत बांधकाम असल्याचे जाहिर होवून मिळण्याकरिता व अज्ञार्थी मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदरची दावा मिळकत हि वादीचे वडिल भागोजी रामजी कदम उर्फ सुतार यांनी नोंदणीकृत खरेदीखत नं. ५३६, ता. २४/११/१९८७ अन्वये श्री. धोंडू लक्ष्मण कदम यांचेकडून खरेदी बेवारसा करुन घेतलेली आहे. सदरचे मुळ खरेदीखत वादी यांनी मे. कोर्टामध्ये दाखल केलेले आहे व ते पुराव्याचेकामी वाचून त्याप्रमाणे निशाणी नंबर पडणे आवश्यक आहे. परंतू सदर खरेदीखत लिहून घेणार, देणार व त्यावरील साक्षीदार, ओळख देणार हे सर्वजन मयत झालेले असून त्यांची साक्ष मे. कोर्टासमोर होवू शकत नाही. तसेच सदरचे खरेदीखत हे ३० वर्षापुर्वीचे असल्यामुळे त्याला भारतीय पुरावा कायदा १८७२ चे कलम ९० प्रमाणे निशाणी नंबर देवून ते पुराव्याकामी वाचणेत यावे याकरिता सदरचा अर्ज दिलेला आहे.

०२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी ११३ येथे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, सदरचे खरेदीखत प्रतिवादी यांनी नंबर १ यांनी नाकबूल केले आहे. खरेदीखतावरील सही करणारा इसम न्यायालयात पिंज–यामधून येवून साक्ष दिल्याखेरीज सदर खरेदीखत पुराव्यात वाचता येणार नाही. खरेदीखतामध्ये लिहून देणा–याचे नाव भागोजी रामजी कदम उर्फ सुतार

असे असून वादीचे नाव हे केवळ गणपत भागोजी सुतार असे आहे. त्यामुळे भागोजी रामजी कदम उर्फ सुतार हि व्यक्ती वादीचे वडिल असल्याचे निष्पन्न होत नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी तर्फे वकीलांनी केली.

०३. वादीने निशाणी क्र. १०७ यादी सोबत खरेदीखतावरील साक्षीदारांचे मृत्यूप्रमाणपत्राची छायांकित प्रत हजर केलेली आहे. त्याचप्रमाणे खरेदीखत लिहून देणार, घेणार व त्यावरील साक्षीदार मयत असल्याबद्दल वादीने सदर प्रस्तुत अर्जासोबत शपथेवरील प्रतिज्ञापत्रानुसार कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी यादी निशाणी ११६ अ.क्र.२ येथे वादींच्या वडीलांच्या मृत्यू दाखल्याची प्रमाणित प्रत हजर केलेली आहे. त्याचप्रमाणे यादी निशाणी ११६ अ.क्र.३ येथे वर नमूद खरेदीखतावरील साक्षीदार बाळाराम सुर्वे यांच्या मृत्यू दाखल्याची प्रमाणित प्रत हजर केलेली आहे. यादी निशाणी ११६ अ.क्र.४ येथे गणपत महाडीक व धाकु रामचंद्र महाडीक हे मयत आहेत असे दर्शविण्याकरिता ग्रामपंचायत देवपूर यांचा दाखला हजर केलेला आहे. त्यावरुन त्यांच्या लाभात खरेदीखत केलेले आहे व खरेदीखतावरील साक्षीदार मरण पावलेले आहे हे दिसुन येते.

०४. भारतीय पुरावा कायदा १८७२ कलम ९० चे अवलोकन करता असे स्पष्ट होते की, ३० वर्षापेक्षा जुना कागद योग्य ताब्यातून हजर केला असेल किंवा न्यायालयाने सदर कागद ज्या त्यक्तीने हजर केला त्याचा ताबा योग्य मानला असे तर सदर कागदावरील सही व इतर प्रत्येक भाग ज्या व्यक्तीच्या हस्ताक्षरातील आहे तो त्या व्यक्तीच्या हस्ताक्षरातील आहे व सदरचा कागद ज्यांनी करुन दिला आहे व ज्यांनी सदर कागदावरील सहया प्रमाणित केलेल्या आहेत त्या त्यांच्या सहया आहेत असे मानण्यात यावे. सदर तरतूदीचे अवलोकन करता वादीने मूळ दस्त दाखल करणेत आवश्यक आहे. वादी यांनी यादी निशाणी ११६ येथे अ.क्र.१ वर

मूळ खरेदीखत जे दिनांक २४/११/१९८७ रोजीचे आहे ते दाखल केलेले आहे. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम ९० मधील तरतुदीनुसार दिनांक २४/११/१९८७ रोजीच्या वादीच्या वडीलांच्या लाभात दावा मिळकतीबाबत खरेदीखत ३० वर्षापेक्षा जुने असल्याने व सदर खरेदीखत योग्य ताब्यातून हजर केले असल्याने त्यास निशाणी देणे जरुरी आहे. सबब, सदर अर्ज मंजूर करण्यात येतो व वादी यांनी निशाणी ११६ अ.क्र.१ येथे हजर केलेल्या रजिस्टर खरेदी खत क्र.५३६ यास भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम ९० नुसार निशाणी देण्यात येते.

सही/–
(एस. एस. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर महाड

महाड
दिनांक : २७/०३/२०२४